पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शिक्षण समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १२
सभावृत्तांत

**दिनांक – ०६/०२/२०२०** **वेळ - दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **०६/०२/२०२०** रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.सागर बाळासाहेब गवळी
४. मा.कदम शशिकांत गणपत
५. मा.सुलक्षणा राजू धर
६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक शिक्षण), मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांना थोर महापुरुषांची अथवा राष्ट्रीय खेळाडूंची नावे देण्याबाबत. – मा.चंदा लोखंडे , मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.
विषय क्र.२) प्राथमिक शाळांमध्ये सध्या असणा-या मानधनानावरील सफाई कामगारांचे मानधन वाढविण्याबाबत.- मा.चंदा लोखंडे , मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.
विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना ड्रेस कोड (गणवेश) करण्याबाबत. – मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १६/०१/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ४४ विषय क्रमांक - १

दिनांक - ०६/०२/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण समितीची सदस्यांनी पाहीणी दौरा केला असता असे निदर्शनास आले आहे की, काही प्राथमिक शाळांना नावे देण्यात आलेली नाही. त्यामुळे शाळांना त्यांच्या जवळच्या परिसरावरुन संबोधले जात आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेना अद्यापही नावे देण्यात आलेली नाहीत. त्या शाळेंना थोर महापुरुषांची अथवा राष्ट्रीय खेळाडूंची नावे देणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४५ विषय क्रमांक - २

दिनांक - ०६/०२/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सध्या मानधनावर सफाई कामगार कार्यरत आहेत. सदरचे मानधनावरील सफाई कामगार हे महिना र.रु.२०००/- या तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत. सध्याच्या महागाईच्या काळामध्ये दोन हजार रुपयांमध्ये कुटूंबाचा उदरनिर्वाह होणे अशक्य आहे. तरी त्यांच्या मानधनामध्ये शासन निर्णयाप्रमाणे किमान वेतन देणेकामी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४६ विषय क्रमांक - ३

दिनांक - ०६/०२/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी विद्यार्थांमध्येही मनपा शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या

वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. मनपा शाळेतील शिक्षक शाळेच्या वेळेत इतरत्र कामानिमित्त् बाहेर असतात. असा प्रकार रोखण्यासाठी त्यांच्यावर नियंत्रण ठेवणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळेतील शिक्षकांना खाजगी शाळेतील शिक्षकांप्रमाणे शाळेत ड्रेस कोड (गणवेश) आवश्यक आहे. जेणेकरुन शिक्षकांमध्ये शिस्तीचे वातावरण निर्माण होईल. व शिक्षक शालेय वेळेमध्ये इतरत्र जाण्यास आळा बसेल. याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांना ड्रेस कोड (गणवेश) करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाटन न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६२/२०२०
दिनांक : ०६/०२/२०२०



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.